लोकमत




मानसिक आरोग्य शिबिरासाठी उपस्थित मार्गदर्शक व संयोजक.

# मानसिक आरोग्य क्षेत्रात कार्यरत प्रतिनिधींना प्रशिक्षण

## मुकुल माधव फाउंडेशन व फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे आयोजन

**पुणे :** मुकुल माधव फाउंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांच्यातर्फे तीन दिवसीय मानसोपचार प्रशिक्षण शिबिर झाले. लंडनमधील कन्सर्न फॉर मेंटल हेल्थच्या टीमने मानसिक आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या प्रतिनिधींना मानसोपचाराचे प्रशिक्षण देण्यात आले. मॉडेल कॉलनीतील सिम्बायोसिस संस्थेत हे प्रशिक्षण शिबिर झाले.

भारतीयांच्या चांगल्या मानसिक आरोग्यासाठी मुकुल माधव फाउंडेशन सहा वर्षांपासून हा कार्यक्रम राबवित आहे. या शिबिरामध्ये प्राथमिक आरोग्यसेवा क्षेत्रात काम करणारे डॉक्टर्स, मानसोपचार तज्ज्ञ, परिचारिका, विशेष शिक्षक आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या इतर कार्यकर्त्यांना वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या निकषांनुसार प्रशिक्षण दिले जाते. आजवर ६५० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करण्यात आले आहे.

प्रशिक्षणार्थींना वर्ल्ड सायकिॲट्रिक असोसिएशनतर्फे मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

लंडन येथून आलेल्या डॉ. गझला अफझल, मौडस्ली हॉस्पिटलच्या डॉ. मिलाविक, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. रम्या मोहन, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. विल्यम शनाहन, फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया आदी उपस्थित होते.

रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या, की मानसिक आरोग्य क्षेत्रात कार्यरत नर्स, मानसोपचार तज्ज्ञ आणि मानसिक आरोग्य क्षेत्रातील इतर व्यावसायिकांसाठी हे प्रशिक्षण आहे.

या पाचवर्षीय भागीदारीमुळे लोकांमध्ये मानसिक आरोग्यविषयी जागरुकता निर्माण होण्यास मदत झाली आहे. (वा.प्र.)